**पोलीस आयुक्तालय, पिंपरी चिंचवड.**
**स्वातंत्र्यवीर सावरकर उद्यानाजवळ, प्रेमलोक पार्क,**
**चिंचवड -४११ ०३३ फोन नं. २७३५०५५५**

जा.क्र. /पोआपिंचि/आस्था-२ /पो. भ. २०१९/ /२०२१ पिंपरी चिंचवड, दिनांक १३/१२/२०२१

# प्रेसनोट

पिंपरी चिंचवड पोलीस दलाच्या आस्थापनेवरील रिक्त असलेल्या ७२० पोलीस शिपाई पदांसाठी पोलीस भरती २०१९ लेखी परीक्षेमध्ये पात्र झालेल्या एकुण ११,५३४ उमेदवारांची यादी संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्यांची शारिरीक मोजमाप, कागदपत्र पडताळणी व मैदानी चाचणी दि. १०/१२/२०२१ ते दि.२०/१२/२०२१ पर्यंत राज्य राखीव पोलीस बल गट क्र. २, वानवडी, हडपसर, पुणे येथील मैदानावर घेण्यात येत आहे. उमेदवारांना प्रवेश बायोमेस्ट्रीक पध्दतीने असून सर्व प्रक्रिया सीसीटीव्ही/कॅमेरा सर्व्हेक्षणाखाली चालू असून पारदर्शक पार पाडली जात आहे. पुरुष उमेदवारांकरीता गोळा फेक, १०० व १६०० मीटर धावणे मैदानी चाचणी असून महिला करीता गोळा फेक, १०० व ८०० मीटर धावणे मैदानी चाचणी आहे. दररोज १५०० उमेदवारांची मैदानी चाचणी घेण्यात येते. सामाजिक संस्थाकडून अल्प दरात उमेदवारांची जेवणची व्यवस्था केली आहे. पिण्याचे पाणी पुरविण्यात आले आहे. उमेदवारांना कोणत्या शंका असल्यास त्याची पडताळणी त्यांचे समक्ष केली जाते. कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता संभ्रम करुन घेवू नये असे आवाहन करण्यात येत आहे. जे उमेदवार निर्धारित तारखेस मैदानी चाचणीस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहीले नाहीत तसेच ज्या उमेदवारांनी कागदपत्र तपासणीस मुळ कागदपत्र सादर केले नव्हते त्या सर्व उमेदवारांनी मुळ कागदपत्र घेवून दि.१६/१२/२०२१ रोजी मैदानी चाचणी करीता हजर रहावे.

**(कृष्ण प्रकाश)**
**पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड.**